आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२८ ऑगस्ट २०२५ - गुरूवार

**<u>ठळक बातम्या</u>**

शक्तीपीठ महामार्गाचा कोल्हापूर जिल्ह्यातला नियोजित आराखडा राज्य सरकारकडून रद्द, पवनार ते सांगली दरम्यानच्या आखणीला मान्यता

मराठा किंवा ओबीसी समाजावर अन्याय न करता दोन्ही समाजाचे प्रश्न सोडवण्याचा मुख्यमंत्र्यांचा पुनरुच्चार, जरांगे आंदोलकांसह पुण्यापर्यंत पोहोचले

विरारमध्ये इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत आतापर्यंत १७ जणांचा मृत्यू, राज्य सरकारकडून आर्थिक मदत जाहीर

**आणि**

राज्यभरात ठिकठिकाणी दीड दिवसांच्या गणपतीच्या विसर्जन

**<><><><>**

कोल्हापूर जिल्ह्यातला शक्तीपीठ महामार्गाचा नियोजित आराखडा राज्य सरकारनं रद्द केला आहे. यासंदर्भातला शासन आदेश आज सार्वजनिक बांधकाम विभागानं जारी केला. पवनार ते सांगली दरम्यानच्या आराखड्याला मान्यता देतानाच, शिरोळ, करवीर, हातकणंगले, कागल, भुदरगड आणि आजरा तालुक्यात या महामार्गाच्या आखणीचे सर्व उपलब्ध आणि संभाव्य पर्याय चाचपण्याचे आदेश राज्य सरकारनं राज्य रस्ते विकास महामंडळाला दिले आहेत. या पर्यायांबाबत कोल्हापुरातले मंत्री, लोकप्रतिनिधी यांच्याशी चर्चा करुन मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री अंतिम निर्णय घेणार आहेत.

शक्तीपीठ महामार्गासाठी भूसंपादनाला सरकारनं मान्यता दिली आहे. यासाठी सुमारे २१ हजार कोटी रुपयांच्या खर्चाला प्रशासकीय मान्यता सरकारनं दिली आहे. सुमारे ८०२ किलोमीटर लांबीच्या या महामार्गामुळं नागपूर-गोवा हा १८ तासांचा प्रवास ८ तासात होण्याची शक्यता आहे.

**<><><><>**

मराठा किंवा ओबीसी समाजावर अन्याय होणार नाही, दोन्ही समाजाचे प्रश्न शासन सोडवेल, याचा पुनरुच्चार मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केला.

**- होल्ड बाईट मुख्यमंत्री - -**

दहा टक्के आरक्षण दिल्यावरही मराठा समाजाच्या आंदोलनाचं कारण कळलेलं नाही. लोकशाहीच्या चौकटीत या मागणीवर काय तोडगा काढता येईल ते पाहू. ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळाल्यावर मराठा समाजाला कितपत फायदा मिळेल याबाबत शंका आहे, त्यामुळे मागणीचा पुनर्विचार मराठा समाजातल्या विचारवंतांनी करावा असं आवाहन त्यांनी केलं.

<><><><>

मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण देण्यासाठी ५० टक्क्याची मर्यादा हटवण्याची मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुंबईत केली. भाजपाने निवडणुकीआधी मराठा आणि धनगर समाजाला आरक्षण देण्याचं आश्वासन दिलं होतं, त्या आश्वासनाचं काय झालं असा प्रश्न सपकाळ यांनी विचारला.

<><><><>

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात अंतरवाली सराटीतून निघालेली यात्रा आज सकाळी पुण्यातल्या शिवनेरीवर पोहचली. यावेळी शिवनेरी किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मस्थळाचे दर्शन घेऊन आंदोलक मुंबईकडे निघाले आहेत. दरम्यान ही यात्रा जुन्नरच्या जवळ असताना सतीश देशमुख या आंदोलकाचा आज हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला.

<><><><>

पैगंबर जयंतीसाठी ५ सप्टेंबर रोजी जाहीर केलेली शासकीय सुट्टी ८ सप्टेंबर रोजी द्यावी, अशी मागणी काँग्रेस कार्यकारिणीचे सदस्य, माजी मंत्री नसीम खान यांनी केली आहे. ६ सप्टेंबर रोजी गणेश विसर्जन आहे, त्यामुळे ५ तारखेची महम्मद पैगंबर जयंतीची मिरवणूक ८ सप्टेंबर रोजी काढण्याचा निर्णय मुस्लीम समाजानं घेतला आहे, याची नोंद घेऊन सुट्टीचा दिवस बदलावा, असं पत्र नसीम खान यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांना पाठवलं आहे.

<><><><>

विरारमध्ये एक इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत आतापर्यंत १७ जणांचा मृत्यू झालेला आहे. तर ९ जण जखमी झाले. विरार मधल्या रमाबाई अपार्टमेंट या चार मजली इमारतीचा मागील भाग मंगळवारी रात्री चाळीवर कोसळला होता. इमारतीमधल्या ५० पैकी

१२ सदनिका यात कोसळल्या. आज संध्याकाळी एनडीआरफनं शोधकार्य थांबवलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबांना ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. या इमारतीला मे महिन्यात स्ट्रक्चरल ऑडिटची नोटीस दिली होती, मात्र लोकांनी ते गांभीर्यानं घेतलं नाही, असं फडनवीस म्हणाले.

**- - होल्ड बाईट मुख्यमंत्री- -**

**<><><><>**

बीड जिल्ह्यात किल्ले धारूर तालुक्यात जोरदार पावसामुळे वाण नदीला पूर आला. आडस-अंबाजोगाई रस्त्यावरच्या पुलावर पाणी येऊन दोन वाहनं वाहून गेली असून दोघांचा मृत्यू झाला आहे. राज्याच्या इतर भागातल्या पावसाविषयी जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - होल्ड पाऊस व्हाइस कास्ट- -**

*(नांदेड जिल्ह्यात पूरपरिस्थिती गंभीर झाली असून देगलूर तालुक्यातल्या सव्वा २ हजार नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवलं आहे. विष्णुपुरी प्रकल्पाचे तीन दरवाजे उघडण्यात आले असून उर्ध्व मानार धरणाचे ७ दरवाजे उघडले आहेत. अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील देगलूर - उदगीर, बिलोली - नरसी हे रस्ते बंद झाले आहेत. नरसी आणि नायगाव शहरात पाणी शिरले आहे. पुरात अडकलेल्या नागरिकांसाठी शोध आणि बचाव कार्य राबवलं जात आहे.*

*भंडारा जिल्ह्यात गोसेखुर्द धरणाचे ३३ पैकी १३ दरवाजे उघडण्यात आले आहेत.*

*लातूर जिल्ह्यात जळकोट आणि शिरूर अनंतपाळ तालुक्यासह एकूण २९ महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे. मांजरा, निम्न तेरणा, तावरजा, रेणा हे प्रकल्प भरल्याने या प्रकल्पाचे दरवाजे उघडण्यात आले आहेत.*

*धुळे शहरात आज दुपारी जोरदार पावसानं हजेरी लावली. सुमारे तासभर मध्यम स्वरुपाचा पाऊस बरसला. यामुळे शहरातील सखल भागात पाणी साचले तर गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांची धावपळ उडाली.*

*सिंधुदुर्ग जिल्हयात आज सुद्धा पावसाचा जोर कायम आहे. सातत्यानं पडत असलेल्या पावसानं नद्या, ओढे दुथडी भरून वाहू लागले आहेत. गेल्या चोवीस तासात*

*जिल्हयात सरासरी ९० मिलीमीटर पाऊस पडला. सततच्या पावसामुळे गणेशभक्तांच्या उत्साहावर मात्र विरजण पडलं आहे.*

*नाशिक शहरासह जिल्ह्यात पावसाचा जोर ओसरला आहे. यामुळे गंगापुर धरणातून होणार विसर्ग कमी करण्यात आला असून गोदावरीच्या पाणीपातळीतही घट झाली आहे.)*

**<><><><>**

दीड दिवसांच्या मंगलमूर्तींचं आज विसर्जन होत आहे. याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**- - होल्ड गणपती व्हाइस कास्ट- -**

*(बृहन्मुंबई महानगरपालिकेनं यंदा २७५ हून अधिक कृत्रिम तलाव उभारले आहेत. यंदा ५०० हून अधिक निर्माल्य कलश विसर्जन स्थळांवर उपलब्ध करण्यात आले आहेत. आज दुपारी तीन वाजेपर्यंत मुंबईत ५७५ घरगुती तर ३ सार्वजनिक गणेशमूर्तींचं विसर्जन झालं. नवी मुंबईत नैसर्गिक २२ विसर्जन स्थळांव्यतिरिक्त विविध विभागांमध्ये १४३ इतक्या मोठ्या संख्येने कृत्रिम विसर्जन तलावांची निर्मिती करण्यात आलेली आहे. रत्नागिरी जिल्ह्यात आज दुपारपासून दीड दिवसांच्या गणपतींच्या विसर्जनाला सुरुवात झाली. आज सुमारे १२ हजार गणपतींना निरोप दिला जात आहे. सततच्या पावसामुळे गणेशभक्तांची तारांबळ उडत आहे.*

*सांगली इथल्या श्री गणपती पंचायतन देवस्थान चा २४६वा रथोत्सव आज मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी भाविक गणपती मंदिरापासून काशी विश्वेश्वर मंदिरापर्यंत रथ ओढला. गोंदियातल्या गोशाळा संचालकांनी गाईच्या शेणापासून श्री गणेशाची बीज युक्त मूर्ती तयार करून तिची प्रतिष्ठापना केली आहे. गौ रक्षणाचं तसंच गाईच्या शेणाचं महत्व इतरांना पटवून देण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.*

*ऋषीपंचमीनिमित्त आज पुण्यात श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती समोर ३५ हजार महिलांनी सामूहिक अथर्वशीर्ष पठण केलं. तसंच नाशिकला त्र्यंबकेश्वर इथं आणि नंदुरबार जिल्ह्यात तापी नदीकिनारी ऋषीपंचमीनिमित्त स्नानासाठी गर्दी उसळली होती.*

*शेगावमध्ये गजानन महाराजांचा ११५वा पुण्यतिथी ऋषिपंचमी महोत्सव उत्साहात साजरा होतो आहे. यानिमित्तानं समाधीस्थळ आणि सर्व मंदीरं दर्शनासाठी संपूर्ण रात्रभर खुली असणार आहेत.*

*‘श्रीगणेशा आरोग्याचा’ उपक्रमातून संपूर्ण राज्यात नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली जात आहेत.)*

**<><><><>**

जेष्ठ अभिनेते दिग्दर्शक बाळ कर्वे यांचं आज सकाळी मुंबईत वार्धक्यानं निधन झालं. ते ८७ वर्षांचे होते. चिमणराव मालिकेत त्यांनी वठवलेली गुंड्याभाऊंची भूमिका अद्याप रसिकांच्या स्मरणात आहे.

बन्या बापू, लपंडाव, सुंदरा सातारकर, चटक चांदणी अशा चित्रपटांमधून तर रथचक्र, तांदूळ निवडता निवडता, आई रिटायर होते, कुसुम मनोहर लेले, शांतता कोर्ट चालू आहे, सूर्याची पिल्ले अशा नाटकांमधून त्यांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला.

सई परांजपे दिग्दर्शित कथा या हिंदी चित्रपटातही कर्वे यांनी काम केलं होतं.

**<><><><>**

शिवसेनेचे नगरसेवक कमलाकर जामसंडेकर हत्या प्रकरणात अरुण गवळीला सर्वोच्च न्यायालयानं जामीन मंजूर केला आहे.

**<><><><>**

म्हाडाच्या कोकण विभागातील ५ हजार २८५ सदनिका आणि ७७ भूखंड विक्रीसाठी आयोजित सोडतीसाठी अर्ज सादर करायला १२ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. प्राप्त अर्जांची सोडत आता ९ ऑक्टोबरला ठाण्यात डॉक्टर काशीनाथ घाणेकर नाट्यगृहात काढली जाईल, असं मुख्य अधिकारी रेवती गायकर यांनी सांगितलं.

**//<><><><>//**